# Community Policing

## ❖महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम

- **प्रस्तावना :-**

महाराष्ट्र हे सजग, क्रियाशिल व अनेक बाबतीत आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. अनेक धर्म, पंथ, जातीचे लोक तसेच अनेक प्रकारचे व्यवसाय, व्यापार करणारे लोक शिवाय स्थित-विस्थापित, स्थलांतरीत लोक या राज्यात राहतात. प्रचंड लोकसंख्या व विविधता यामुळे राज्यातील तंटे व खटल्याचे प्रमाणही मोठे आहे.

गावात छोटया कारणावरुन तंटयाची सुरुवात होते. छोटया तंटयाचे पुढे मोठया तंटयात रुपांतर होते. कधी-कधी दिवाणी तंटयातुन फौजदारी तंटे निर्माण होतात. त्यातुनच मग कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येते. म्हणुन निर्माण झालेले तंटे लोकसहभागाने, सामोपचाराने व आवश्यक तेथे प्रशासनाची मदत घेवुन सोडविण्याची व्यवस्था निर्माण होण्यासाठी शासनाने गृह विभागाचे शासन निर्णय : एमआयएस/१००७/सीआर-२३८/पोल-८, मंत्रालय, मुंबई दिनांक १९ जुलै २००७ नुसार महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम संपुर्ण राज्यात राबविण्याबाबत आदेश पारीत केले.

- **उद्देश :-**

गांव पातळीवर तंटे निर्माण होवु नये म्हणुन उपक्रम राबविणे, दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणा-या तंटयाचे निराकरण करुन ते कमी करणे, गावासाठी गावातुनच लोकसहभागातुन तात्काळ व सर्वमान्या तडजोड घडवुन आणण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे, गावातील जनतेमध्ये जातीय व धार्मीक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, पोलीसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणुन त्यांची जनमानसातील प्रतिमा सुधारुन “ जनतेचे सेवक ” अशी प्रतिष्ठा प्राप्त करणे.

- **रचना :-**

सदर योजनेनुसार राज्यस्तरावर, विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर तसेच गांव पातळीवर ग्रामपंचायतीमार्फत एक तंटामुक्त समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. गाव पातळीवरील समितीच्या अध्यक्षांची व सदस्यांची निवड ग्रामसभा आयोजित करुन करण्यात येते. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी सदर मोहीमेस सुरवात करण्यात येते व गावाचे मुल्यमापन करुन पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते.

# ❖ पोलीस मित्र समिती ( मोहल्ला समिती )

- **प्रस्तावना :-**

जनतेच्या सक्रीय सहकार्या शिवाय पोलीसांना आपले कोणतेही काम कार्यक्षमरित्या प्रस्थापीत करणे शक्य नाही. जनतेत जातीय सलोखा कायम राहावा व जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी जे अनेक परिक्षण केल्या गेले आहेत त्यात असे दिसुन आले की, पोलीस मित्र समिती ही सर्वात कारगर समिती आहे.

- **उद्देश :-**

पोलीस मित्र समिती ही प्रामुख्याने जातीय तणाव निर्माण होवुन दंगली होवु न देणे, समाजात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहावी, राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक वातावरण सौहार्दपुर्ण राहावे या करीता पोलीस मित्र समीती गठीत करण्यात येते. स्थानिक गुन्हेगार, समाजकंटक, विघातक कृत्य करणारे यांचेवर नियंत्रण ठेवण्याकरीता तसेच महत्वाचे सण, उत्सव ईत्यादी शांततेने पार पाडण्याकरीता पोलीस मित्र समितीचा सहभाग घेण्यात येतो.

- **रचना:-**

पोलीस स्टेशन हद्दीतील जातीय दृष्टया संवेदनशील विभाग ठरवुन प्रत्येक विभागाकरीता एक स्वतंत्र पोलीस मित्र समिती स्थापण करण्यात येते. सदर समिती मध्ये सर्वसाधारणपणे २० ते २५ सदस्य असतात. पोलीस मित्र समीती मध्ये सर्व समाजाचे प्रतिष्ठीत नागरीक, पुरुष व महीलांचा सहभाग असतो. त्याचप्रमाणे व्यापारी संघटना, कामगार संघटना, महीला मंडळ, शिक्षक, वकील, पत्रकार, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, व्यावसायीक यांचा समावेश असतो.

प्रत्येक महीण्यास बैठकीचे आयोजन करुन निर्माण होणाऱ्या नागरी समस्या तसेच पोलीस विभागाशी संबंधित अडी-अडचणी सोडविण्याबाबत सामुहीक चर्चा करुन अडचणी सोडविण्याचे प्रयत्न केले जातात.

## ❖ **शांतता समिती**

- **प्रस्तावना :-**

समाजामध्ये शुल्लक कारणांचे भांडवल करुन आपला स्वार्थ साध्य करण्याकरीता काही असामाजिक तत्वे हे सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याचा प्रयत्न करीत असतात. सामाजिक स्वास्थ्य व कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकरीता शांतता समिती गठीत करण्यात येते.

- **उद्देश :-**

भारतीय समाजामध्ये अनेक जाती-धर्म-पंत असुन त्यांचे सण, उत्सव, रितीरिवाज, परंपरा हया वेगवेगळया आहेत. परिणामतः सण, उत्सवामध्ये काही अप्रिय घटना घडल्यास अथवा घडण्याचा संभव असण्याची शक्यता असल्यास शांतता समितीच्या माध्यमातुन बैठक आयोजित करुन सामाजिक शांतता व जातीय सलोखा प्रस्थापित करण्यात येतो.

- **रचना :-**

जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर तसेच पोलीस स्टेशन स्तरावर शांतता समितीची स्थापना करण्यात येते. या समितीमध्ये सर्व जाती-धर्मातील, समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे प्रतिष्ठित नागरीक, धर्मगुरु, मुल्ला-मौलवी, बिशेप, समाजसुधारक तसेच स्वयंसेवी संस्था, व्यावसायिक मंडळे, व्यापारी असोसिएशन, इ. चे प्रतिनिधींचा समावेश करण्यात येतो.

## ❖ झोपडपट्टी पोलीस पंचायत

- **प्रस्तावना :-**

शहराच्या विस्तारीकरणा बरोबरच शहरात मोठया प्रमाणात नागरीक ग्रामीण भागातुन व इतर राज्यातुन उपजिविकेसाठी येत असतात. या नागरीकांना शहरातील निवासस्थाने भाडयाने अगर विकत घेणे शक्य नसते, तेव्हा हे नागरीक झोपडया उभारुन राहतात. त्यामुळे सर्वच प्रमुख शहरात, तालुका स्तरावर मोठया प्रमाणावर झोपडपट्टयांची वाढ झालेली आहे. तसेच त्याठिकाणी दैनंदिन समस्येबरोबरच गुन्हेगारी सुद्धा प्रचंड प्रमाणात फोफावली आहे. हया वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरीताच झोपडपट्टी पोलीस पंचायत हा अभिनव उपक्रम पोलीस विभागामार्फत सुरु करण्यात आला आहे.

- **उद्देश :-**

झोपडपट्टीमध्ये लोक फार दाटीवाटीने राहतात. याठिकाणी बऱ्याच नागरी सुविधांचा अभावाप्रमाणे पोलीस व्यवस्थेचा देखील अभाव असतो. झोपडपट्टी भागातील लोकांची किरकोळ भांडण-तंटे सामंजस्याने सोडविणे ज्याचे रुपांतर जातीय तणावात अगर खुन सारख्या गंभीर गुन्हयामध्ये होण्याची शक्यता अधिक असते. त्याचप्रमाणे दैनंदिन घडामोडी, सदर भागात येणारे-जाणारे लोक यांचेवर लक्ष ठेवणे, इ. कामे झोपडपट्टी पोलीस पंचायत मार्फत पार पाडले जातात. गुन्हे प्रतिबंध शिवाय पोलीस व गोर-गरीब जनतेमध्ये चांगले सामंजस्याचे संबंध प्रस्थापित करणे हा या समितीचा महत्वपुर्ण उद्देश आहे.

- **रचना :-**

झोपडपट्टी पोलीस पंचायत ही संकल्पना एक मुलभुत गुन्हे प्रतिबंधक योजना आहे. यामध्ये संबंधित बीटमधील कर्मचारी आणि झोपडपट्टीमधील रहिवाशी यांचेकडुन निवडलेले १५ प्रतिनिधी यांची मिळुन समिती स्थापन करण्यात येते. सदर समितीमध्ये १५ पैकी  ५ महीला प्रतिनिधी असतात.